


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १३८, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.३१ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## नववर्षानिमित्त रेल्वे प्रवाशांना खास भेट, पुणे-नागपूर मार्गावर धावणार विशेष गाड्या

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, नागपूर :** नववर्षाच्या आसपास दरवर्षी होणारी प्रवाशांची गर्दी पाहता मध्य रेल्वेने विशेष रेल्वेगाड्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेने नागपूर-हडपसर-नागपूर तसेच पुणे-नागपूर-पुणे विशेष रेल्वेगाड्यांचे नियोजन केले आहे.

कसं असेल वेळापत्रक?



प्रवाशांना लांब पल्ल्याचा प्रवास सुरक्षित, आरामदायी करता यावा, यासाठी नागपूर-हडपसर-नागपूर विशेष एक्स्प्रेसच्या ८ फ`ऱ्या होणार असून, गाडी क्रमांक ०१२२१ नागपूर-हडपसर विशेष एक्स्प्रेस ही विशेष गाडी सोमवार, बुधवार व शुक्रवारला नागपूर येथून सायंकाळी १९.४० वाजता सुटेल. शनिवार २७ डिसेंबर, सोमवार २९ डिसेंबर, बुधवार ३१ डिसेंबर आणि शनिवार ३जानेवारीला दुसऱ्या दिवशी दुपारी ११.२५ वाजता हडपसर पुणे येथे पोहोचणार आहे. गाडी क्रमांक ०१२२२ हडपसर-नागपूर विशेष एक्स्प्रेस ही विशेष रेल्वेगाडी मंगळवार, गुरुवार व शनिवारी हडपसर येथून दुपारी १५.५० वाजता सुटेल. २८ डिसेंबर (रविवार), ३० डिसेंबर (मंगळवार),१ जानेवारी २०२६), ४ जानेवारी २०२६ला (रविवार) दुसऱ्या दिवशी सकाळी ०६.३० वाजता नागपूर येथे पोहोचेल.

कुठे असतील थांबे?

या गाडीला अजनी, वर्धा, धामणगाव, बडनेरा, अकोला, शेगाव, मलकापूर, भुसावळ, जळगाव, चाळीसगाव, मनमाड, कोपरगाव, पाचोरा, बेलापूर, अहमदनगर व दौंड कॉर्ड लाइन हे थांबे देण्यात आले आहेत. गाडी क्रमांक ०१४१९ पुणे-नागपूर विशेष एक्स्प्रेस शनिवार, सोमवार व बुधवार रोजी पुणे येथून रात्री २०.३० वाजता सुटेल. २७डिसेंबर (शनिवार), २९ डिसेंबर (सोमवार), ३१ डिसेंबर २०२५ (बुधवार) व ३ जानेवारी २०२६ (शनिवार) ही रेल्वेगाडी दुसऱ्या दिवशी दुपारी १४.०५ वाजता नागपूर येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१४२०-नागपूर-पुणे विशेष एक्स्प्रेस रविवार, मंगळवार व गुरुवार रोजी नागपूर येथून सायंकाळी १६.१० वाजता सुटेल. २८ डिसेंबर (रविवार), ३० डिसेंबर (मंगळवार), १ जानेवारी २०२६ (गुरुवार) व ४ जानेवारी २०२६ (रविवार) ही गाडी दुसऱ्या दिवशी दुपारी ११.४५ वाजता पुणे येथे पोहोचेल. या गाडीला दौंड कॉर्ड लाइन, अहमदनगर, बेलापूर, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव, वर्धा व अजनी येथे थांबे देण्यात आले आहेत.

---

### सुखी संसाराची राखरांगोळी!

## पतीने झोपेतच पत्नीसह मुलाला निर्घृणपणे संपवलं



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, बुलढाणा :** पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत पतीने झोपेत असलेल्या पत्नी व चार वर्षीय पोटच्या मुलास कुऱ्हाडीने वार करून ठार केले. मेहकर शहरातील शिक्षक कॉलनीमध्ये सोमवारी मध्यरात्री दोन वाजताच्या सुमारास ही घटना घडली.

*** काय घडलं?**

रुपाली राहुल मस्के (३०) व रियांश राहुल मस्के (०४) अशी हत्या झालेल्या मायलेकाची नावे आहेत. आरोपी राहुल हरी मस्के (३३) यास मेहकर पोलिसांनी अटक केली आहे. झोपलेल्या अवस्थेत असतानाच राहुलने क्रूरतेचा कळस गाठत मायलेकाचा जीव घेतला. आपला पोटचा गोळा असलेल्या चिमुकल्या रियांशवर कुऱ्हाडीने घाव घालताना आरोपीचे हात थरथरले नाही. घटनेची माहिती समजताच ठाणेदार व्यंकटेश्वर आलेवार, एपीआय संदीप बिरांजे घटनास्थळी दाखल झाले. मुलीचे वडील भास्कर वानखेडे (रा. मोळा, ता. मेहकर) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

*** पोलिस बंदोबस्तात अंत्यसंस्कार...**

रुपाली व मुलगा रियांशचा खून झाल्याने माहेरची मंडळी संतप्त झाली आहे. नातेवाइकांचा रोष पाहता पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला. मोळा येथे माहेरी मायलेकांवर अंत्यसंस्कार करण्यात आले.

तर दुसरीकडे, सासरकडील मंडळींनी चाकूने वार करून जावयाला ठार मारण्याचा प्रयत्न केला. ही थरारक घटना यशोधरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील यादवनगर येथे घडली. सुशील हरिश्चंद्र वासे (वय ३६, रा. यादवनगर) असे जखमीचे नाव आहे. गेल्या दोन वर्षांपासून सुशील यांच्या पत्नी माहेरी राहतात. २७ डिसेंबरला सकाळी पत्नीची समजूत घालून तिला परत घरी आणण्याकरिता सुशील हे सासरी गेले. परंतु, त्यांची पत्नी घरी आली नाही. सुशील घरी परतले. दुपारी २ वाजताच्या सुमारास सुशील हे घरी झोपले होते. सुशील यांच्या पत्नीचे नातेवाईक दोघे सुशील यांच्या घरी आले. विकासने चाकूने सुशील यांच्यावर वार केले व दोघेही पसार झाले. सुशील जखमी झाले. त्यांना मेयो हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. याप्रकरणी पोलिसांनी प्राणघातक हल्ल्याचा गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली.

---

## नववर्षानिमित्त सप्तशृंगीदेवीचे मंदिर २४ तास खुले



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, कळवण :** नाताळ सुट्ट्यांचा कालावधी, शाकंबरी नवरात्रोत्सव, नववर्षाचे स्वागत यामुळे संभाव्य गर्दीच्या अनुषंगाने सप्तशृंगगडावरील भगवतीचे मंदिर दर्शनासाठी रात्रभर खुले ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आजपासून (दि.३०) ४ जानेवारीपर्यंत हा निर्णय लागू असेल. २४ तास आदिमायेचे दर्शन मिळणार असल्याने भाविकांना सुलभतेने दर्शनाचा लाभ घेणे शक्य होणार आहे.

लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेले श्रीक्षेत्र सप्तशृंगगड येथील श्री भगवती सप्तशृंगी माता मंदिर येथे सालाबादप्रमाणे नाताळ उत्सव संदर्भीय सुट्ट्यांचा कालावधी, शाकंबरी नवरात्रोत्सव, नववर्षाचे स्वागताला प्रतिवर्षी गर्दी होते. गर्दीचे व्यवस्थापन व भाविकांना समाधानकारक व सुलभतेने दर्शन होण्याच्या दृष्टीने श्री भगवती मंदिर ट्रस्टच्या वतीने मंगळवार, ३० डिसेंबरपासून रविवार, ४ जानेवारीपर्यंत दररोज २४ तास दर्शनरांग सुरू ठेवण्यात येणार आहे. देवीच्या दर्शनासाठी राज्यभरातून विशेषत: उत्तर महाराष्ट्रातून गडावर दाखल होणाऱ्या भाविकांना या निर्णयचा मोठा फायदा होणार आहे. भाविकांनी सदर सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन विश्वस्त संस्थेने केले आहे. नवीन वर्षाचे स्वागत देवदर्शनाने करण्याचा पायंडा मागील काही वर्षांपासून दृढ झाला आहे. शेकडो भाविक त्र्यंबकेश्वर, शिर्डी, शेगावला रवाना झाले आहेत. तर बाहेरील भाविकांनी वेरूळ येथे घृष्णेश्वराच्या दर्शनासाठी गर्दी केली आहे. मंदिरात पहाटेपासून भाविकांची गर्दी आहे.

---

## भीमा कोरेगाव अभिवादन सोहळ्याची जय्यत तयारी...

### ड्रोन आणि सीसीटीव्हीची राहणार नजर...

**अक्षराज : प्रमोद दिवेकर**

**दि.३०, भीमा कोरेगाव (पुणे) :** १ जानेवारी रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी लाखो अनुयायी येणार आहेत. या सोहळ्यासाठी प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे. पुणे शहर पोलिसांनी सुरक्षेचे कडेकोट नियोजन केले आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि सोहळा शांततेत पार पडावा, यासाठी तब्बल साडेसात हजार पोलीस अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात येणार असल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिली.

अभिवादन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी त्रिस्तरीय सुरक्षा यंत्रणा कार्यान्वित केली आहे. शहर पोलीस दलातील ६,००० आणि बाहेरील जिल्ह्यांतून मागवलेले १,२०० पोलीस असा एकूण ७,२०० पोलिसांचा फौजफाटा तैनात असेल.

तसेच १,००० होमगार्ड आणि राज्य राखीव पोलीस दलाच्या (SRPF) तुकड्या मदतीला असतील. गर्दीवर नियंत्रण मिळवण्यासाठी आणि परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी विशेष 'पोलीस टॉवर' उभारण्यात आले असून ड्रोनद्वारे आकाशातून देखरेख केली जाणार आहे.

भीम अनुयायांना सोयीसाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहे. येणाऱ्या अनुयायांना कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. परिसरात २२ ठिकाणी प्रशस्त वाहनतळांची सोय करण्यात आली आहे.

याशिवाय, येथील पोलिस टॉवर, ड्रोनद्वारे परिस्थितीवर देखरेख ठेवण्यात येणार आहे. चोरीचे प्रकार रोखण्यासाठी विशेष पोलिस पथके नेमण्यात आली आहेत.

नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर ३१ डिसेंबर रोजी अनुचित घटना घडू नये, स्वतंत्र बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. शहरातील फर्ग्युसन रस्ता, महात्मा गांधी रस्ता, नळस्टॉप चौक, हडपसर अमनोरा, चांदणी चौक यासह विविध प्रमुख चौकांमध्ये नाकाबंदी करण्यात येणार आहे.




या ठिकाणी ड्रोनच्या माध्यमातून पाळत ठेवली जाणार आहे. शहरात 'ड्रंक अँड ड्राईव्ह' मोहीम तीव्र करण्यात आली असून, ६० ठिकाणी नाकाबंदी करून मद्यपी वाहनचालकांची तपासणी सुरू आहे. वाहतूक शाखेकडून मागील वर्षभरात सुमारे साडेसहा हजार मद्यपी वाहनचालकांवर कारवाई करण्यात आली आहे.

**महापालिका निवडणुकीसाठी प्रतिबंधात्मक कारवाई...**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवरही कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. सराईत गुन्हेगारांकडून मतदारांवर दबाव तंत्राचा वापर होऊ नये, तसेच निवडणूक प्रक्रियेत गुन्हेगारांचा सहभाग राहू नये यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे.

गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणाऱ्यांवर लक्ष ठेवण्यासाठी गुन्हे शाखा, सातही पोलिस परिमंडळाकडून विशेष पथके नियुक्त करण्यात आली आहेत. पब्ज, बिअर बार आणि मद्यविक्रीच्या दुकानांवरही विशेष लक्ष ठेवले जात आहे. सुमारे पाच हजार सराईत गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे, असे अमितेश कुमार यांनी सांगितले.

---

## आम्ही विश्वास ठेवला, पण भाजपने विश्वासघात केला...

### महायुती तुटली, आता थेट लढत... शिंदेंच्या मंत्र्याची मोठी माहिती

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३०, छत्रपती संभाजीनगर :** 'भाजपच्या हट्टामुळे आणि आग्रही भूमिकेमुळे छत्रपती संभाजीनगरमधील महायुती अखेर तुटली आहे. आम्ही विश्वास ठेवला, पण भाजपने विश्वासघात केला,' अशा तिखट शब्दांत राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी भाजपवर हल्लाबोल केला आहे. जिल्ह्यातील जागावाटपाचा तिढा सुटण्याऐवजी आता थेट संघर्ष सुरू झाला असून, येथे मैत्रीपूर्ण नव्हे तर 'थेट लढत' होणार असल्याचे शिरसाट यांनी स्पष्ट केले.

**स्थानिक पातळीवर भाजपचा 'कट'...**



संजय शिरसाट यांनी भाजपच्या स्थानिक नेत्यांवर गंभीर आरोप करताना म्हटले की, मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी युती टिकवण्यासाठी प्रयत्न केले, मात्र स्थानिक पातळीवर भाजपने 'कट' रचला. बैठकांमध्ये एक बोलायचे आणि प्रत्यक्षात शिवसेनेच्या जागा कापायच्या, ही भाजपची रणनीती असल्याचा दावा त्यांनी केला. 'आमची ताकद वाढली म्हणून आम्ही काहीही करू शकतो, या भाजपच्या गैरसमजातूनच हा अहंकार निर्माण झाला आहे,' असेही ते म्हणाले.




संभाजीनगरमध्ये युती व्हावी असा प्रयत्न मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी प्रयत्न केला. स्थानिक पातळीवर आम्ही बैठका घेतल्या, स्थानिक कार्यकर्ते वेगळ्या भूमिकेत पाहायला मिळाले, आधीच शंका आली होती, मी दरवेळी स्थानिक नेत्यांना फोन करून बैठका केल्या, बावनकुळे यांच्याबरोबर देखील बैठक झाली. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसमोर जागा वाटप ठरलं. त्यावेळी युती झाली या संभ्रमात होतो. मात्र ज्यावेळी जागा द्यायची तेव्हा शिवसेनेच्या जागा सोडल्या जातील असा प्रस्ताव दिला. दुसरीकडे युतीच्या चर्चा होत्या. या घडीला सुद्धा कोणताही नवीन प्रस्ताव दिला नाही, आग्रही भूमिका केला तडा दिला, अशा भाषेत शिरसाट यांनी भाजपवर टीका केली आहे.

**'स्थानिक नेत्यांना आवरा, अन्यथा उघड बोलेन'...**

निवडणुकीच्या तोंडावर भाजपने अंधारात मुलाखती घेऊन गोंधळ निर्माण केल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. 'कुठे कट शिजला, याची सर्व माहिती आमच्याकडे आहे. मला तोंड उघडायला लावू नका, स्थानिक नेत्यांना आवरा,' असा सज्जड इशाराही त्यांनी यावेळी दिला.




## नवे वर्ष नवा संकल्प !

सरत्या वर्षाला निरोप देताना आणि नववर्षाचे स्वागत करताना आपल्यापैकी अनेक जण आत्मचिंतन करतात. सरत्या वर्षासाठी आपण कोणकोणते संकल्प केले होते, त्यापैकी किती पूर्ण झाले आणि किती शेष आहेत, केलेले संकल्प पूर्ण न होण्यामागे नक्की कोणकोणते अडथळे आले आणि त्यासोबतच येणाऱ्या वर्षात आपल्याला कोणकोणती शिखरे किती काळात गाठायची आहेत, येणाऱ्या अडचणींवर कशाप्रकारे मात करायची आहे याचे गणित मांडतात. हे संकल्प पूर्ण करण्यासाठी आपल्याला काय काय प्रयत्न करावे लागणार आहेत याची जंत्री बनवतात. प्रतिवर्षी केले जाणारे हे संकल्प बऱ्याचदा व्यावहारिक स्वरूपाचे असतात. विद्यार्थी एखादी परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होण्याचा संकल्प करतात, व्यावसायिक आपल्या व्यवसायात अधिकाधिक उत्पन्न मिळवण्याचा, व्यवसाय वाढवण्याचा संकल्प करतात, कार्यालयीन कर्मचारी कार्यालयात प्रमोशन आणि वेतनवृद्धी मिळवण्याच्या दृष्टीने संकल्प करून त्यासाठी करावयाच्या प्रयत्नांची सूची बनवतात, नवीन गाडी, घर किंवा एखादी महागडी वस्तू विकत घेण्याचा संकल्प करतात, स्त्रीवर्ग येत्या वर्षात नवीन दागिना, वस्तू विकत घेण्याचा, पैसे बचतीचा संकल्प करतात. दरवर्षी केले जाणारे हे संकल्प पुढील काही दिवस आपल्या प्रयत्नांना ऊर्जा देण्याचे कार्य करत असतात. जीवनात यश-अपयश येण्यामागे जसे आपले नशीब कारणीभूत असते तसे आपले गुण आणि दोषही कारणीभूत असतात. आपल्यापैकी किती जण वर्षाअखेरीस आपल्यात असलेल्या आणि वर्षभरात वाढलेल्या दोषांचे चिंतन करतात आणि हे दोष घालवण्यासाठी, आपल्यात नसलेले गुण आणण्यासाठी आणि अल्प प्रमाणात असलेल्या गुणांच्या वृद्धीसाठी प्रयत्न करतात ? आपल्यामध्ये अनेक दोष आहेत आणि ते वेळोवेळी उफाळून येतात. या दोषांमुळे आपले अनेकदा नुकसान होते, चुकीचे निर्णय घेतले जातात ज्यामुळे पश्चाताप करण्याची वेळ आपल्यावर येते हे प्रत्येकालाच ज्ञात असते; मात्र या दोषांची सूची बनवून येणाऱ्या वर्षात हे दोष कमी करण्यासाठी आणि सोबत आपल्यात नवनवीन गुण आणण्याच्या दृष्टीने आपण संकल्प करतो का ? यंदा असा संकल्पही करून पाहूया.दोषासोबत आपल्याला असलेला चुकीच्या सवयी, व्यसने यांची सूची बनवूया आणि त्यापैकी किती दोष आणि सवयी येणाऱ्या वर्षात कमी करायच्या, त्यासाठी कोणकोणते प्रयत्न करायला हवेत, कोणाकोणाचे साहाय्य घ्यायला हवे हेही लिहून काढूया आणि त्यासाठी टप्प्याटप्प्याने प्रयत्न करूया. वैयक्तिक स्तरावर संकल्प करताना काही सामाजिक स्तरावरील संकल्पही यावर्षी करूया. अनेक व्यक्तींचा मिळून समाज बनतो. आपण प्रत्येक जण समाजाचा एक अविभाज्य घटक आहोत. आपले शारिरिक आणि मानसिक आरोग्य हे सर्वस्वी समाजावर अवलंबून आहे. त्यामुळे तो निरोगी, सुदृढ आणि सशक्त असणेही तितकेच महत्वाचे आहे. आजमितीला या समाजाला अनेक दुष्प्रवृतींनी ग्रासले आहे, ज्याचा परिणाम समाजातील प्रत्येक घटकाला भोगावा लागत आहे. भ्रष्टाचार, गुंडगिरी, स्त्रियांवरील अत्याचार, लहान मुलांचे शोषण, जातीपातीतील तंटे, तरुणांमधील व्यसनाधीनता, प्रमुख शहरांना पडत चाललेला अमली पदार्थांचा विळखा,ऑनलाईन गेमिंग ऍप्सना बळी पडत चाललेली तरुणाई, टीव्ही आणि गेम्स आदींच्या नादात लहान मुलांचे हरवत चाललेले बालपण, फास्ट फूड-जंक फूड आदीच्या आहारी गेल्यामुळे वाढत चाललेली आजारपणे, भाज्या-फळे, धान्य, दूध आणि दुग्धजन्य उत्पादने यांमधील भेसळ, अन्नपदार्थांत वाढत चाललेला रसायनांचा वापर, बनावट औषधाचे वाढते स्तोम, घरभेदी सिरीयल्स, अश्लील-हिंसक वेबसिरीज आणि चित्रपट, मोबाईल मध्ये गुंतत चाललेले जीवन या सर्वांचा परिणाम म्हणून नातेवाईक आणि मित्र परिवार यांतील हरवत चाललेला सुसंवाद, पोलीस, डॉक्टर,वकील, शिक्षक ज्यांवर डोळे झाकून विश्वास ठेवला जात असे अशांमध्ये काही प्रमाणात पसरत चाललेली विश्वासघातकी वृत्ती यांसारख्या अनेक समस्या आज सामाजिक स्तरावर भेडसावत आहेत, ज्याचा परिणाम कुठेनाकुठे प्रत्येकाच्या जीवनावर पडत आहे. यासाठी राजकीय मंडळी किंवा सरकार काही करेल ही अपेक्षा करण्यापेक्षा या सर्वांच्या निर्मूलनासाठी मीं काय करू शकतो याचा विचार सरत्या वर्षाला निरोप देताना प्रत्येकाने करायला हवा. समाजात पसरलेल्या या विविध रोगाना मीं किंवा माझे कुटुंबीय, माझा मित्रपरिवार यापैकी कुणी बळी पडला आहे का याचा शोध घेऊन त्यातून बाहेर पडण्यासाठी मीं काय करायला हवे याचे चिंतन करून त्या दिशेने प्रयत्न करायला हवेत. माझा समाज सुधारण्यासाठी आणि त्याचे स्वास्थ उत्तम राखण्यासाठी प्रयत्न करणे हें माझे सामाजिक कर्तव्य आहे याची जाणीव ठेवून त्यासाठी मीं काय करू शकतो यादृष्टीने येत्या वर्षाकरिता संकल्प करून पाहूया. महाराष्ट्र भूमी ही छत्रपती शिवरायांची भूमी आहे ज्यांनी तुन्टपुंज्या मावळ्यांच्या बळावर पाच पाटशाह्यांना लोळवले. अत्याचारी यवनांचे सामाज्य उध्वस्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. ही भूमी देशभक्त क्रांतिकारकांची आहे ज्यांनी भारतमातेला परतंत्र्यातून मुक्त करण्यासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवले, प्रसंगी प्राणाचे बलिदान दिले. ही भूमी समाजसुधारकांची आहे ज्यांनी सामाजिक दुष्प्रवृत्तीच्या विरोधात लढण्यासाठी आपले जीवन समर्पित केले. या सर्वांचा आदर्श घेऊन नवीन वर्षात वैयक्तिक प्रगतीचे संकल्प करताना सामाजिक सुधारणेचाही संकल्प करूया. आज ना उद्या समाजातील पालट आपल्याला नक्कीच जाणवेल.

# नवे वर्ष कसे असावे !

## आशा, आत्मपरीक्षण आणि जबाबदारीचा संकल्प...




नवे वर्ष दारात उभे असते तेव्हा केवळ कॅलेंडर बदलत नाही; माणसाच्या मनातही एक नवा आरंभ जन्म घेतो. मागील वर्षाच्या आठवणी, जखमा, अपयश, आनंद, संघर्ष आणि यश यांचा गठ्ठा पाठीवर घेऊन आपण पुढे चाललो असतो. म्हणूनच नवे वर्ष हे फक्त शुभेच्छांचे औपचारिक निमित्त न राहता, आत्मपरीक्षणाचे, बदलाचे आणि जबाबदारी स्वीकारण्याचे पर्व असायला हवे. आजचा समाज वेगवान आहे, पण विचाराने मागे पडत चालला आहे. तंत्रज्ञान प्रगत झाले, साधने वाढली; मात्र संवेदना कमी होत आहेत. नवे वर्ष कसे असावे, हा प्रश्न विचारताना आपण आधी हे ठरवायला हवे की आपल्याला कोणते माणूसपण जपायचे आहे. स्पर्धेच्या गर्दीत माणूस हरवणार नाही, अशी दिशा नवे वर्ष देऊ शकेल का? याचे उत्तर आपल्या वर्तनात दडले आहे.

नवे वर्ष सत्य आणि प्रामाणिकपणाचे असावे. खोट्या आश्वासनांचा, पोकळ घोषणांचा आणि दिखाव्याच्या विकासाचा कंटाळा समाजाला आला आहे. राजकारण असो वा प्रशासन, नातेसंबंध असोत वा सार्वजनिक जीवन, प्रामाणिकपणा हीच खरी सुधारणा ठरू शकते. बोलण्यात नव्हे, तर कृतीत दिसणारे सत्य हेच नवे वर्ष मागते. नवे वर्ष समतेचे आणि न्यायाचे असावे. वाढती विषमता, दुर्लक्षित घटकांचे प्रश्न, शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि वंचितांचे वास्तव, या साऱ्यांकडे डोळेझाक करून विकास शक्य नाही. समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचेल, ही केवळ घोषणा नव्हे तर प्रत्यक्ष कृती नवे वर्ष घडवू शकते.

नवे वर्ष संवेदनशीलतेचे असावे. आज आपण पटकन दुखावतो, पटकन चिडतो, आणि तितक्याच पटकन विसरतो. पण माणूस म्हणून आपण ऐकणे, समजून घेणे आणि मदत करणे विसरत चाललो आहोत. एखाद्याच्या वेदनेला शब्दांची नव्हे, तर उपस्थितीची गरज असते. ही संवेदना समाजात रुजवणे हे नवे वर्षाचे मोठे आव्हान आहे. नवे वर्ष विचारशील तरुणाईचे असावे. तरुण हातात भविष्य आहे, पण त्या हातांना योग्य दिशा हवी. केवळ नोकरी, पैसा किंवा प्रसिद्धी हेच ध्येय न राहता समाजासाठी काहीतरी देण्याची प्रेरणा निर्माण झाली, तरच नवे वर्ष अर्थपूर्ण ठरेल. प्रश्न विचारणारी, अन्यायाविरुद्ध उभी राहणारी तरुणाई हेच देशाचे खरे भांडवल आहे.

नवे वर्ष पर्यावरण-जागरूकतेचे असावे. विकासाच्या नावाखाली निसर्गाचा ऱ्हास झाला, तर येणारी वर्षे आपल्याला माफ करणार नाहीत. पाणी, हवा, जंगल, जमीन, हे केवळ संसाधन नाहीत, तर आपल्या अस्तित्वाचा श्वास आहेत. नवे वर्ष निसर्गाशी समन्वय साधणारे असावे, संघर्ष करणारे नव्हे. नवे वर्ष जबाबदारी स्वीकारणारे असावे. चूक झाली तर दोष दुसऱ्यावर ढकलण्याऐवजी स्वतःकडे पाहण्याची तयारी असली पाहिजे. नागरिक म्हणून, पालक म्हणून, अधिकारी म्हणून, पत्रकार म्हणून, शिक्षक म्हणून आपापल्या भूमिकेची जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली, तर बदल अटळ आहे.

खरेतर नवे वर्ष कसे असावे, यापेक्षा आपण कसे असावे हा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. कारण वर्ष बदलते, पण समाज बदलतो तो माणसामुळे. म्हणून या नव्या वर्षात मोठमोठ्या संकल्पांपेक्षा छोटे, पण प्रामाणिक बदल करू या. एकमेकांशी माणूस म्हणून वागू या, अन्यायाविरुद्ध आवाज उठवूया आणि आशा जिवंत ठेवूया. नवे वर्ष हे केवळ शुभेच्छांचे नव्हे, तर संकल्पांचे वर्ष ठरू दे. कारण जेव्हा माणूस बदलतो, तेव्हाच वर्षालाही नवेपण येते. नवे वर्ष आपल्यासाठी आरोग्य, समाधान, लेखणीला नवे बळ, विचारांना नवी दिशा आणि समाजाला स्पर्श करणारे सृजन घेऊन येवो, हीच सदिच्छा. सदैव आपल्या शब्दांतून सत्य, संवेदना आणि सामाजिक भान व्यक्त होत राहो. सर्वांना नववर्षाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**- प्रविण बागडे, नागपूर**
**भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९**

---

## बाय बाय २०२५




शब्दपण जडावले
करताना समारोप
तरी सुहास्य द्यावा
जुन्या वर्षा निरोप

स्नेह माती मनाची
छान रूजवले रोप
बहारदार दिस सरे
सुखक्षण ते अमोप

विसरावे कुक्षणास
आले अनेकप्रकोप
नशीब रुसे कैकदा
साही वेदना प्रकोप

कधी निंदानालस्ती
धडाडी संकट तोफ
भल्याबु-यासाक्षीने
विणला सुंदर गोफ

काळजी काळजात
चाळवीत शांतझोप
आपल्या माणसांचे
झाले विचित्रआरोप

चालतरहावे तरीही
डगमगली नसे होप
निसर्गहीपालटतोय
सुशोभितकरे खोप

आयुष्य खडतर बरे
सोडू नका खटाटोप
कालाच्या माथ्यावर
नव वर्षाचा शिरटोप

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज अचूक ... बातमी

# वादाशिवाय साहित्य संमेलन व्हावे!

९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन १ ते ४ जानेवारी दरम्यान सातारा येथे मराठी भाषेतील ज्येष्ठ लेखक पानिपतकार विश्वास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या संमेलनाची तयारी पूर्ण झाली असून साहित्य रत्नांचे स्वागत करायला सातारा नगरी सज्ज झाली असून या संमेलनाची कार्यक्रम पत्रिकाही नुकतीच जाहीर करण्यात आली आहे.

तब्बल ३२ वर्षानंतर सातारा येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होणार आहे. सातारा हे केवळ ऐतिहासिक वारसा आणि निसर्गसौंदर्यासाठीच प्रसिद्ध नाही तर साहित्य आणि कला यांचे केंद्र म्हणूनही प्रसिद्ध आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेले हे शहर मराठी साहित्याच्या या महाकुंभाचे आयोजन करण्यास सज्ज झाले आहे. राज्य सरकारमध्ये कॅबिनेट मंत्री असलेले शिवेंद्रराजे भोसले हे या साहित्य संमेलनाचे संमेलनाचे स्वागताध्यक्ष असून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजितदादा पवार हे देखील या साहित्य संमेलनाला उपस्थित राहणार आहे. हे साहित्य संमेलन महाराष्ट्र साहित्य परिषद, शाहूपुरी शाखा व मावळा फाऊंडेशन यांच्या मार्फत आयोजित केले जात आहे. या साहित्य संमेलनात मोठ्या संख्येने राजकीय नेते उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राजकीय नेत्यांसोबत साहित्य रसिकही या संमेलनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत केवळ महाराष्ट्रातूनच नव्हे तर देशातील अनेक राज्यातून मराठी साहित्य रसिक या साहित्य संमेलनाला हजेरी लावेल असा विश्वास आयोजकांना आहे. साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन मराठी साहित्य रसिकांना पर्वणीच ठरणार आहे. यावेळच्या साहित्य संमेलनाला मोठ्या प्रमाणात रसिक भेट देतील यात शंका नाही त्यामुळेच साताऱ्यात होणारे हे साहित्य संमेलन ऐतिहासिक ठरेल यात शंका नाही. या साहित्य संमेलनात विविध विषयांवर परिसंवाद, चर्चा तसेच भरगच्च कार्यक्रम होणार आहे. संमेलनाचेअध्यक्ष विश्वास पाटील यांच्या भाषणाकडे साहित्य वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे. संमेलनात सांस्कृतिक कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे.

तसेच अनेक ठराव करण्यात येणार आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर होणारे हे पहिलेच साहित्य संमेलन असल्याने या साहित्य संमेलनाचे वेगळे महत्व आहे त्यामुळेच हे साहित्य संमेलन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. साहित्य संमेलन आणि वाद हे समीकरण गेल्या काही वर्षापासून बनले आहे. हे समीकरण यावेळी तरी बदलावे, या साहित्य संमेलनाला कोणत्याही वादाचे गालबोट लागू नये अशी अपेक्षा साहित्य रसिक व्यक्त करीत आहेत. अजून तरी या साहित्य संमेलनाविषयी कोणताही वाद उत्पन्न झाला नाही ही आनंदाची बाब आहे. असेच वादाविना साहित्य संमेलन पार पडावे. साहित्य संमेलन म्हणजे सारस्वतांचा मेळा वारकरी ज्या प्रमाणे पंढरपूरची वारी न चुकता करतात त्याप्रमाणे साहित्यिकही न चुकता संमेलनाला हजेरी लावतात. साहित्य रसिकही साहित्यिकांचे मत, विचार, चर्चा ऐकण्यासाठी आतुर असतात पण दरवेळी नको त्या विषयावर वाद होतो आणि त्या वादाच्या छायेतच साहित्य संमेलन पार पडते. त्यामुळे साहित्य संमेलनाचा मूळ उद्देशच भरकटतो. माध्यमात देखील त्या वादावरच चर्चा होते त्यामुळे साहित्य रसिकांचा मोहभंग होतो. त्यामुळे वादा शिवाय साहित्य संमेलन पार पडेल याची दक्षता आयोजकांनी घ्यावी. याशिवाय संमेलन आणखी लोकप्रिय होऊन तरुणाई या साहित्य संमेलनाकडे कशी आकर्षित होईल याचाही विचार आयोजकांनी करावा. आजचे तरुण सोशल मीडियाचा अधिकाधिक वापर करतात. तरुण वर्गाला साहित्य संमेलनामध्ये आकर्षित करायचे असेल आयोजकांनी साहित्य संमेलनाला समाज माध्यमांशी जोडावे. आयोजकांनी साहित्य संमेलनाचे सर्व अपडेट फेसबुक, इंस्टाग्राम, व्हॉट्सअप, ट्विटर या सारख्या समाज माध्यमांवर द्यावीत म्हणजे तरुणाईत देखील साहित्य संमेलन लोकप्रिय होईल. छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा लाभलेल्या साताऱ्यात होत असलेल्या हे ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन लोकप्रिय होऊन कोणत्याही वादाशिवाय पार पडेल ही अपेक्षा. ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला मनापासून शुभेच्छा!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

---

# पक्षबदलूंना जनतेने धडा शिकवा !

महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष जोमाने तयारीला लागले आहेत. पक्षाची अधिकृत उमेदवारी देताना वार्डातील जुन्या जाणत्या एकनिष्ठ कार्यकर्त्यापेक्षा त्या वार्डात वजन कुणाचे आहे याचा विचार आधी केला जात आहे मग तो कोणत्याही पक्षाचा का असेना. त्याला आपल्याकडे खेचण्याची स्पर्धा सध्या रंगताना पाहायला मिळते आहे. एखाद्या पक्षाच्या तिकिटावर निवडून आलेल्या उमेदवाराने पक्षाशी एकनिष्ठ राहावे यासाठी १९८५ मध्ये पक्षांतरबंदी कायदा करण्यात आला. या कायद्यान्वये उमेदवाराने निवडून आल्यानंतर अन्य पक्षात प्रवेश केला, तर त्याचे त्या सभागृहाचे सदस्यत्व रद्दबातल ठरवण्यात येते; मात्र निवडणुकांच्या तोंडावर जो घोडेबाजार चालतो त्यावर दुर्दैवाने कायद्याचा कोणताच अंकुश ठेवण्यात आलेला नाही. पक्षाने तिकीट नाही दिले, पक्षश्रेष्ठींविषयी नाराजी, पक्षांतर्गत मतभेद किंवा अन्य पक्षाने दिलेली मोठी ऑफर अशा या ना त्या कारणाने अनेक नेतेमंडळी निवडणुकांच्या तोंडावर पक्ष बदलत असतात. पक्षाची प्रमुख मंडळीही अन्य पक्षातील मोठा मासा आपल्या गळाला लागावा यासाठी बराच काथ्याकूट करत असतात. ही पक्षबदलू मंडळी आपल्याशी एकनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांनाही सोबत घेऊन जातात. बड्या राजकीय पक्षांना हे नित्याचे असले, तरी सामान्य कार्यकर्त्यांचा मात्र अशा घटनांतून हिरमोड होत असतो. आपल्या स्वार्थासाठी दर निवडणुकांना खांद्यावरील झेंडे बदलणारी ही मंडळी कधीतरी जनतेशी एकनिष्ठ राहू शकतील का ? अशा पक्षबदलू स्वार्थांध उमेदवारांना खरेतर जनतेनेच मतदानातून धडा शिकवायला हवा.

**- सौ. मोक्षदा घाणेकर,**
**काळाचौकी, मुंबई**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## रब्बी पिकांसाठी 'कुकडी'चे आवर्तन सुरू

### जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, अहिल्यानगर :** रब्बी हंगामातील पिकांसाठी शेतकऱ्यांकडून होणारी पाण्याची मागणी लक्षात घेता, राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी कुकडी प्रकल्पाचे आवर्तन सोडण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशानुसार २६ डिसेंबरपासून पाणी सोडण्यास सुरुवात झाली असून, जलसंपदा विभागाने पुढील ४० दिवसांचे नियोजन निश्चित केले आहे.

नगरपरिषद निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे कालवा सल्लागार समितीची बैठक होऊ शकली नव्हती. मात्र, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होताच शेतकऱ्यांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी विखे पाटील यांनी तातडीने आवर्तन सोडण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. या निर्णयामुळे पुणे (आंबेगाव, शिरूर, जुन्नर), सोलापूर (करमाळा) व अहिल्यानगर (कर्जत, श्रीगोंदा, पारनेर) या तीन जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. रब्बी पिकांना या पाण्याचा वेळेत व पुरेसा लाभ व्हावा, यासाठी ४० दिवसांचे काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश मंत्र्यांनी दिले आहेत. सद्यस्थितीत प्रकल्पात २६ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. उपलब्ध पाण्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी समन्यायी पद्धतीने करण्याचे धोरण अवलंबण्यात आले आहे. पाण्याचा कोणताही अपव्यय न होता. कालव्याच्या शेवटच्या टोकावरील गावालाही पाणी मिळावे,अशा सूचनाही विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## टाकळीढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने कृष्णा झावरे यांचा सन्मान



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथील ॲड.कृष्णा पंडितराव झावरे पाटील यांची अहिल्यानगर जिल्हा न्यायालयातील अहमदनगर बार असोसिएशनच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. टाकळी ढोकेश्वर गावाच्या वेशी समोरील पारावर ग्रामस्थांच्या वतीने ॲड.कृष्णा झावरे यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी खासदार निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, ॲड.कृष्णा झावरे, धोंडिबा शेटे, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ग्रामपंचायत सदस्या बापूसाहेब रांधवण, वाबळे, ढुस आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

बाळासाहेब खिलारी म्हणाले की, बिकट परिस्थितीतून शिक्षण घेऊन कृष्णा झावरे यांनी जिल्हा बार असोसिएशनच्या अध्यक्षपदी पर्यंत मारलेली मजल सर्व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांसाठी अभिमानास्पद आहे. अहिल्यानगर जिल्हा बार असोसिएशनच्या अध्यक्ष म्हणून काम करण्याची संधी मिळाली आहे. सर्वात कमी वयाचे अध्यक्ष म्हणून त्यांचे कार्य राहणार आहे. वकील संघटनेच्या क्षेत्रातील त्यांचे कार्य व योगदानाबद्दल त्यांची झालेली निवड सर्वांसाठी प्रेरणादायी असल्याचे खिलारी यांनी सांगितले. सत्काराला उत्तर देताना नुतन अध्यक्ष ॲड कृष्णा झावरे म्हणाले मी यापूर्वी सन २०१७ - १८ मध्ये उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले आहे,वकीलांनी मोठ्या बहुमताने माझ्यावर विश्वास टाकला. या विश्वासाला पात्र ठरत वर्षभर विविध उपक्रम राबवून वकिलांचे प्रश्न, प्रलंबित समस्या सोडवण्यास प्राधान्य देऊ. सर्व सहकारी पदाधिकारी आणि वकील वर्गाला सोबत घेऊन संघटनेच्या हितासाठी काम करणार आहे. सर्व मित्र परिवारच्या व टाकळी ढोकेश्वर ग्रामस्थांच्या वतीने झालेल्या सन्मानाने आनखी चांगले कार्य करण्यास बळ मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## दिव्यात आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान दिवा आगासन आयोजित आरोग्य शिबीर संपन्न



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा शहरातील आगासन श्री हनुमान मंदिरात अखंड हरीनाम सोहळ्याचे दि.२९ डिसेंबर ते ०१ जानेवारी २०२६ पर्यत आयोजन करण्यात आले असून १ जानेवारी रोजी महाराज यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. या निमित्ताने दिव्यात आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान आयोजित मोफत भव्य आरोग्य शिबीराचे करण्यात आले होते. हल्लीच्या जीवन शैलीत होणारे शारीरिक आजार, वाढती रुग्णसंख्या, वाढणारा कर्करोगा सारखा दुर्दर आजाराचे प्रमाण खूप वाढतंय चालले असून या पार्श्वभूमीवर या आजारावर नियंत्रण कसे आणायचे ? यादृष्टीने आगरी महिला शक्ती प्रतिष्ठान नेहमीच कार्यरत असते म्हणून टाटा मेमोरियल सेंटर मुंबई, डॉ.शर्मिला पिपंळे व त्यांचा एकूण १८ डॉक्टर्स स्टाप मिळून कर्करोगाची तपासणी करण्यात आली.

नेत्र तपासणी व अल्प दरात चष्मा वाटप, दंत तपासणी, ब्लड प्रेशर, वजन तपासनी, पूर्ण बॉडी चेक आदी करण्यात आले. प्रसंगी आगासन गावासह आजूबाजूच्या परिसरातील असंख्य महिलांनी आपली उपस्थिती दर्शवली तसेच अनेक पुरुषांनीही सदर शिबिरातचा लाभघेतला तसेच दिवा शहरातील अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी ही लाभ घेतला. प्रसंगी सदर शिबिरात अनेक मान्यवरांनी आपली उपस्थिती दर्शीविली. अंगणवाडीच्या जगताप, शिवशक्ती रिक्षा युनियनचे अध्यक्ष विनोद भगत, माजी नगरसेविका निर्मला म्हात्रे, डॉ.शर्मिला पिपंळे (टाटा मेमोरियल सेंटर मुंबई हेड) डॉ.पराग जोशी (मानवकल्याण हॉस्पिटल), डॉ.रितू यालगी तसेच आगरी महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा उषाताई मुंडे यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यां महिला तसेच आगासन गावा ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्यार्थिनींनी व्हाट्सअप, फेसबुकच्या आभासी दुनियेला बळी पडू नये - मिलिंद पोंक्षे

## परभणी पोलीस दलाच्या एक संवाद विद्यार्थीनीशी या कार्यक्रमात शेकडो मुलींशी साधला संवाद



**अक्षराज : बाळासाहेब फुलपगार**

**दि.३०, पालम (परभणी) :** सध्या चालू असलेल्या इंस्टाग्राम, व्हाट्सअप, फेसबुक, स्नॅपचॅट या आभासी दुनियेवर विद्यार्थिनींनी विश्वास ठेऊ नये व या आभासी दुनियाच्या आकर्षणाला बळी पडू नये असे प्रतिपादन मुंबई येथील प्रसिद्ध व्याख्याते मिलिंद पोंक्षे यांनी केले. ते आज परभणी पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या संकल्पनेतून एक संवाद विद्यार्थिनीशी या उपक्रमच्या माध्यमातून शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थिनींना निर्भय बनवणे, कायद्याची मूलभूत माहिती देणे विद्यार्थिनी व पोलीस समन्वय, याचबरोबर मुलींना छेडछाड विषयक त्रास देणाऱ्या बद्दल उपाययोजना करणे. या विषयावर मार्गदर्शनपर खुला संवाद व चर्चासत्राचे आयोजन पालम येथील ममता विद्यालयात करण्यात आले होते.

या प्रसंगी ते बोलत होते, पुढे बोलतांना मिलिंद पोंक्षे म्हणाले विद्यार्थिनीनी आपल्या आई-वडिलांनी काबाडकष्ट करून ज्या ध्येयसाठी आपल्याला शिकायला पाठवलेला आहे त्यावरच लक्ष केंद्रित करून जीवनात ध्येय आत्मसात कसे करावे, या आभासी दुनियेत स्वतःला कसे वाचवावे विषयी अनेक उदाहरणे देत मुलींना जागृत केले. आपले आई-वडील सोडता कोणाच्याही बोलण्याला बळी न पडता कुणावरही विश्वास ठेवू नका, फक्त स्वतःवर विश्वास ठेवा, कोण कसा गळा कापेल याचे सध्या काही सांगता येत नाही हे त्यांनी आजपर्यंत अनुभवलेले हजारो उदाहरणामधील काही घडलेल्या घटनेचे उदाहरण देऊन मुलींना एक नवीन दिशा दिली. कोणाही ऐऱ्यागैर्या सोबत एक दोन महिन्यांच्या फोन वरच्या बाचतीत वर विश्वास ठेवुन पळुन जाऊ नका हा मोलाचा संदेश त्यांनी दिला. मुलींना कोणीही फसवू शकत नाही, ८० टक्के मुली स्वतःच अति आकांक्षा पायी फसतात. आणि मग नंतर दुसऱ्यांना नावे ठेवतात हे त्यांनी उदाहरणे देऊन पटवून दिले. मुलीची स्वतः परवानगी असल्याशिवाय मुलीला कोणीही फसवू शकत नाही, हे त्यांनी ठासून सांगितले. मुलींनी नाही म्हणायला शिका, डोळ्यात डोळे घालून बोलायला शिका, तसेच जुन्या प्रथा परंपरा मोडीत काढून स्वतःचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी जे घडले ते बोलायला शिका हा संदेश त्यांनी उपस्थित सर्व मुलींना दिला.

या कार्यक्रमाचे प्रथम सत्र सकाळी ९ वाजता पालम येथील ममता विद्यालयात घेण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पोलीस निरीक्षक शेषराव खटाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. या दरम्यान पोलीस निरीक्षक खटाने व सुचिता शिंगाडे यांनी मनोगत व्यक्त करत विध्यार्थीनी चे मनोबल वाढवले, यावेळी सपोनि मंजुषा मोरे, सपोनी सुचिता शिंगाडे, दिपक जम्बोरे, प्राचार्य अंभोरे एस एम, मस्के डी.आर, जाधव एस.पी, मोरे पी.बी, एलमैटे, बोकारे एम.डी, जाधव एस.बी यांच्यासह सर्व शिक्षक वृंद व पालम मधील मोठ्या प्रमाणात विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

या दरम्यान कार्यक्रमाचे दुसरे सत्र पेठ शिवणी येथे घेण्यात आले. यावेळी पेठ शिवणी तंटामुक्ती अध्यक्ष बालाजी अण्णा बरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमास सर्व शाळा व कॉलेजमधील शेकडो विद्यार्थिनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.परभणी जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिह परदेशी यांच्या आदेशाने निरीक्षक शेषराव खटाणे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यादरम्यान पालम व पेठशिवणी येथील शाळेतील सर्व विदयार्थीनी व कॉलेजचे प्राचार्य, शिक्षकवृंद उपस्थित होते.

# वेदिका आलिमकर हिचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल...

## प्रभाग क्रमांक २९ (अ) चा विकास करण्यासाठी कटिबद्ध !



**अक्षराज : विनोद वास्कर**

**शिळगांव (ठाणे) :** ठाणे महानगरपालिका निवडणूक २०२६ करिता शिळगावातील कुमारी वेदिका सुनिल आलिमकर हिने अपक्ष उमेदवारी म्हणून प्रभाग क्रमांक २९, (अ) मधून नगरसेवक पदासाठी आज अर्ज दाखल केले. मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी पंचक्रोशीतील सर्व गावदेवी मातेचे दर्शन घेऊन आजी, आई-वडिलांचे आशीर्वाद घेऊन, आपल्या आजोबा धोंडू आलिमकर यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि जनतेची सेवा करण्यासाठी प्रथमच नगरसेविकासाठी उमेदवारी अर्ज दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी दाखल केला.

कोणताही गाजावाजा न करता आपल्या कुटुंबाच्या सदस्यांना सोबत घेऊन अर्ज दाखल केला.

प्रभाग क्रमांक २९ मध्ये शिळ, फडकेपाडा, डायघर, खार्डी पडले, देसाई पाच पाडे, खिडकाळी, साबे, भोलेनाथ नगर, शिळ ठाकूरपाडा, कल्याण फाटा, डावले, भोईर कंपाऊंड, अशा अनेक विभागाच्या परिसरामध्ये पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, रस्ते, गटारे, पद दिवे, स्मशानातील सुविधा, प्रवासासाठी बस थांबा, रिक्षा चालकांसाठी रिक्षा स्टॅन्ड, शाळेच्या समस्या, घाट दुरुस्ती, तलाव स्वच्छता, प्रभागामध्ये पाय वाटा, ह्या जुन्या समस्या आहेत. त्यातर वेदिका आलिमकर सोडवणारच इतरांपेक्षा काहीतरी वेगळं करून दाखवण्याची दमक वेदिका आलिमकर यांच्यामध्ये आहे. डोक्यामध्ये नवीन कल्पना नवीन विचार आहेत. अनेक संकल्पना त्यांनी गोरगरीब नागरिकांसाठी आखल्या आहेत.

भविष्यात नागरिकांसाठी त्याचा फायदा होणार आहे. त्यांच्या आजोबांचे आणि वडिलांचे पंचक्रोशीतील नागरिकांसोबत चांगला जनसंपर्क दांडगा आहे.नागरिकांसोबत जिव्हाळ्याचे संबंध आहेत. याचाच फायदा कुमारी वेदिका आलिमकर यांना होणार आहे. वेदिका आलिमकर हिने उच्च शिक्षण सुद्धा घेतले आहे. याचाच फायदा तिला नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी होणार आहे.

तसेच प्रभागातील सर्व नागरिकांचा विश्वास, प्रेम आणि आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे , जनताजनार्धनाच्या सहकार्याने प्रभागाचा सर्वाधिक विकास साधण्यासाठी मी कटिबध्द आहे. असे वेदिका आलिमकर म्हणाल्या, त्यांना अक्षराज मीडिया कडून मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

# बल्लारपुरात जुन्या पॉवर हॉऊस परिसरात कोंबड झुंजीवर



## बल्लारपूर पोलिसांची धाड; तिन अटकेत

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३०, बल्लारपूर (चंद्रपूर) :** बल्लारपूर येथील जुन्या पावर हाऊसच्या मागील झुडपी जंगल परिसरात कोंबड्यांच्या झुंजीवर पैशांची बाजी लावून सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर बल्लारपूर पोलिसांनी धडक कारवाई केली. या प्रकरणी तिघा आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार अधिनियम कलम १२(ब) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गौरव मनोज वैरागडे (वय २२), रा. विसापूर, गणेश तुळशिराम मेंदाळे (वय ३२), रा. गांधी वार्ड बल्लारपूर आणि गणेश चरणदास गराड (वय ४२), रा. विसापूर अशी आरोपींची नावे आहेत. ही कारवाई २८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारच्या सुमारास करण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त होत आहे.

मौक्यावरील तपासात दोन कोंबडे मृतावस्थेत तर तीन कोंबडे जिवंत आढळले.

आरोपींच्या अंगझडतीत जुगारातून मिळालेली रोकड, तीन दुचाकी वाहने, कोंबड्यांच्या पायात बांधलेल्या कात्या (धारदार हत्यारे) तसेच इतर साहित्य असे एकूण सुमारे ८२ हजार २८० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पोलीस ठाणे बल्लारपूर येथील गुन्हे शोध पथकाने खात्रीशीर माहितीच्या आधारे छापा टाकण्यात आला.

छाप्यात आरोपी कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळत असल्याचे आढळून आले. पोलिसांना पाहताच काही इसम पसार झाले, तर तिघे आरोपी घटनास्थळी मिळून आले. सदर कारवाई पोलीस निरीक्षक बिपिन इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विकास जुमनाके, प्रवीण नीकोडे, पोअं सचिन अल्लेवार, लखन चव्हाण, गुरू शिंदे यांनी केले.

# सेंट मायकल्स इंग्लिश स्कूल चंद्रपूरची व्हॉलीबॉल खेळाडू हिमानी गौरकर हिची महाराष्ट्र संघात निवड



**अक्षराज. : वसंत वडस्कर**

**दि.३०, चंद्रपूर :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अकोला यांचे संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय व्हॉलीबॉल मुलींच्या महाराष्ट्र संघात सेंट मायकल इंग्लिश स्कूलची खेळाडू हिमानी प्रवीण गौरकर हिची निवड करण्यात आली. सेंट मायकल इंग्लिश स्कूल येथे इयत्ता पाचव्या वर्गामध्ये प्रवेश घेऊन, व्हॉलीबॉल खेळाचे प्रशिक्षण व मार्गदर्शन घेत नियमित सरावाच्या माध्यमातून हिमानीला हे यश प्राप्त करता आले. तसेच ती जिल्हा व्हॉलीबॉल प्रशिक्षण केंद्र चंद्रपूर येथे नियमित सराव करीत असून, तालुका क्रीडा अधिकारी संदीप उईके, शाळेचे क्रीडा शिक्षक सुनील वडस्कर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. आपला पाल्य उत्तम खेळाडू व्हावा, याकरिता आई-वडिलांची भूमिका फार महत्त्वाची असते. वडील प्रवीण गौरकर व आई मनीषा गौरकर यांचे वेळोवेळी मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळेच तिला यशस्वी वाटचाल करता आली. दि.०५ ते ०९ जानेवारी २०२६ रोजी या कालावधीत कडप्पा आंध्र प्रदेश येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरील व्हॉलीबॉल १४ वर्षाखालील मुलींच्या महाराष्ट्र संघाचे हिमानी गौरकर प्रतिनिधित्व करणार आहे. शाळेतील खेळाडू राष्ट्रीय व राज्यस्तरावर पोहोचण्याकरिता खेळाडूंना व क्रीडा शिक्षकांना विद्यालयाचे प्राचार्य विकास कोल्हेकर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभत आहे. विद्यालयाला मिळालेल्या व्हॉलीबॉल खेळातील यशाबद्दल खेळाडू हिमानी गौरकर, क्रीडा शिक्षक सुनील वडस्कर यांचे प्राचार्य विकास कोल्हेकर, उपप्राचार्य सुधीर सिंग, विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून राष्ट्रीय स्तराकरिता शुभेच्छा दिल्या.

# विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे येथील शाळेचे चैतन्य योग शिबिर अत्यंत उत्साहात संपन्न

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.३०, नवी मुंबई :** विद्यार्थी विद्यालय कोपरखैरणे यांचे तीन दिवसीय निवासी योग शिबिर नुकतेच संपन्न झाले. सदर शिबीर हे चैतन्य चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने अत्यंत निसर्गरम्य अशा हरित वेली वृक्ष नदी नाले आणि वनराई ने नटलेल्या व गगनगिरी महाराजांच्या वास्तव्याने पावन झालेल्या तपभूमीत म्हणजेच गगनगिरी महाराज आश्रम खोपोली या ठिकाणी घेण्यात आले. हे सदर शिबिर नुकतेच पार पडले. सदर शिबिरामध्ये विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे नवी मुंबई चे ५० विद्यार्थी आणि ८ शिक्षक यांनी सहभाग नोंदवीला. शिबिरात विद्यार्थ्यांचा शारीरिक मानसिक बौद्धिक विकास साधण्यासाठी योग्य असे मार्गदर्शन करण्यात आले. शिबिरामध्ये योगसाधने मधील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्राणायाम, कपालभाती उज्जयी ओंकार उच्चारण तसेच विविध प्रकारचे आसन विद्यार्थ्यांना शिकवण्यात आली .त्याचबरोबर स्वसंरक्षणासाठी लाठीकाठी कराटे आणि आनंदमय असे आरोबिक चे मार्गदर्शन देखील अत्यंत उत्तम पद्धतीने करण्यात आले.

बौद्धिक विकासासाठी आवश्यक असणाऱ्या त्राटक आणि योगीक निद्रा व मानसिक विकास साठी आवश्यक असणाऱ्या ध्यान प्रक्रिया विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना समजावून सांगण्यात आल्या आजच्या युगामध्ये सर्व काही धकाधिकेचे जीवनामध्ये स्वतः च्या शरीराकडे आणि बुद्धीच्या विकासाकडे हेतू पुरस्कारपणे दुर्लक्ष केले जाते. अशा वेळेस विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढवावी, त्यांची बौद्धिक क्षमता वाढावी, विद्यार्थ्यांनी नैतिक मूल्ये स्वीकारावी आणि त्याचा अधिकाधिक चांगला विकास होऊन त्यांनी जीवनामध्ये यशस्वी व्हावे.



या दृष्टिकोनातून शाळेच्या मुख्याध्यापिका नेहा गवळी यांनी सदर शिबिरामध्ये आपल्या विद्यार्थ्यांचा सहभाग नोंदवला. सदर शिबिराचे आयोजन चैतन्य चॅरिटेबल ट्रस्टचे भगवान शेवकर यांच्या मार्गदर्शनाखाली योगगुरु राजेश चव्हाण यांनी अत्यंत सहज व सोप्या भाषेत विद्यार्थ्यांना योग साधना कशी करावी हे सांगितले.

तसेच सारिका चव्हाण, छाया शिंदे यांनी विद्यार्थ्यांना आसनांची माहिती दिली. तर समुपदेशक प्रकाश पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या ध्येय व ध्येय साध्य करण्याविषयी माहितीपूर्ण अशी बौद्धिक सत्र घेतली. तर इतिहास तज्ञ व मुद्रा अभ्यासक डॉक्टर पंकज बोराडे यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातून आपण काय घ्यावे यावर अत्यंत प्रभावी पूर्ण शब्दांमध्ये माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांच्या राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था चैतन्य चॅरिटेबल ट्रस्ट आणि गगनगिरी खोपोली आश्रम यांच्या वतीने अत्यंत उत्तमरीत्या करण्यात आली होती. सदर शिबीर यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापिका नेहा गवळी तसेच अमोल खिलारे, दीपक नवले, चंद्रकांत बरफ, ज्योती ससाणे, वर्षा शिर्के, कोमल पाटील आदी शिक्षकांनी परिश्रम घेतले.

# थोडक्यात

## प्राध्यापक जीवन आरेकर यांना पी.एच.डी ची पदवी प्रदान

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.३०, पेण :** महाराणा प्रताप कृषी व तंत्रज्ञान विद्यापीठ उदयपूर अंतर्गत राजस्थान कृषी महाविद्यालय उदयपूर यांच्या १९व्या पदवीदान समारंभात नुकतेच राजस्थानचे महामहिम राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्या शुभ हस्ते प्राध्यापक जीवन आरेकर यांना पी.एच.डी कृषी (वनस्पती रोगशास्त्र) विषयात पदवी प्रदान करण्यात आली. सदर कार्यक्रमाला राजस्थानचे कृषिमंत्री डॉ.किरोदीलाल मीना तसेच निर्देशक डॉ.अरविंद वर्मा उपस्थित होते. जीवन आरेकर यांनी डॉ.अमित त्रिवेदी प्राध्यापक (वनस्पती रोगशास्त्र) यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली आणि डॉ.प्रमोद बोरकर सहयोगी प्राध्यापक यांच्या सह मार्गदर्शना खाली त्यांनी कोकणातील मिरची वरील करपा रोगाला कारणीभूत असणाऱ्या बूरशी ची जैवविविधता आणि व्यवस्थापन या विषयावर संशोधन कार्य पूर्ण केले. त्यांनी आपल्या सदर संशोधनाचा प्रबंध मार्च २०२५ रोजी सादर केला. परंतू औपचारिक स्वरूपात डिसेंबर महिन्यात १९ व्या पदवी दान समारंभात सदर पदवी प्रदान करण्यात आली. प्रा.जीवन आरेकर हे कृषि विज्ञान केंद किल्ला रोहा रायगड येथे गेली १८ वर्षे शास्त्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. डॉ.जीवन आरेकर यांनी पी.एच.डी पदवी प्राप्त झाल्यावर डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली चे सन्मानिय कुलगुरू महोदय डॉ.संजय भावे व विस्तार संचालक डॉ.मकरंद जोशी तसेच कृषि विज्ञान केंद्र किल्ला रोहा रायगड येथील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे यांचे आभार मानले.




# पनवेल मनपा निवडणूक; शेवटच्या दिवसापर्यंत एकुण ४०० उमेदवारी अर्ज प्राप्त

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.३०, पनवेल :** राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार पनवेल सार्वत्रिक निवडणूक बुधवार, १५ जानेवारी २०२६ रोजी होत आहे, तर मतमोजणी व निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर होणार आहे. निवडणूक प्रक्रियेचा पहिला महत्त्वाचा टप्पा असलेल्या नामनिर्देशन प्रक्रियेला मंगळवार, २३ डिसेंबरपासून सुरुवात झाली होती, तर आज दिनांक ३० डिसेंबर रोजी सांगता झाली. आजच्या उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत एकुण ४०० उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत.



यामध्ये मंगळवार, दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी शेवटच्या दिवशी निवडणूक कार्यालय नावडे १, प्रभाग १,२ आणि ३ रोजी एकूण ७६ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

निवडणूक कार्यालय ०२ अ खारघर, प्रभाग ४,५,६ येथे एकूण ५२ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

निवडणूक कार्यालय ०३ ब कळंबोली, प्रभाग ७,८,९,१र० येथे एकूण ७७ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

निवडणूक कार्यालय ०४ क कामोठे, प्रभाग ११,१२,१३ येथे एकूण ६० नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

निवडणूक कार्यालय ०५, ड पनवेल प्रभाग १४,१५,१६ येथे एकूण ५२ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

निवडणूक कार्यालय ०६, ड पनवेल-२ प्रभाग १७,१८,१९,२० येथे एकूण ५४ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले.

दि.३० डिसेंबर २०२५ रोजी एकूण सहा निवडणूक निणर्य अधिकारी कार्यालयातून ३७१ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले आहेत. तसेच दिनांक २९ डिसेंबर रोजी एकुण २९ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. दोन दिवसात एकुण ४०० पत्र प्राप्त झालेत.

नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजल्यापासून सुरू होणार आहे. वैधरीत्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची यादी छाननीनंतर प्रसिद्ध केली जाईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक शुक्रवार, २ जानेवारी असून, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली आहे. तर, शनिवार, ०३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार असून, त्याच दिवशी अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध होणार आहे.

## नायगाव येथील मेंढपाळ काळे कुटुंब आहे अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत

**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.३०, खंडाळा (सातारा) :** खंडाळा तालुक्यातील नायगाव हे गाव सावित्री माता यांचे जन्मस्थान असल्यामुळे संपूर्ण भारतामध्ये प्रसिद्ध आहे. या गावांमध्ये सर्व बहुजन समाज गुन्यागोविंदाने राहत आहेत. परंतु याला काही समाजकंटक आपल्या गावगुंड प्रवृत्तीमुळे बदनाम करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, नायगाव तालुका खंडाळा येथील मेंढपाळ विनायक रामचंद्र काळे वय वर्ष ६५ हे नेहमीप्रमाणे पती-पत्नी दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ रोजी मेंढ्या चारण्यासाठी त्यांनीच गावातील काळ मुस्की नावाच्या शिवारात पैसे देऊन रान मेंढ्या चालण्यासाठी घेतले आहे. तिथे मेंढ्या चालत असताना बाळचंद नेवसे व ज्ञानदीप नेवसे या दोघांनी मिळून मेंढपाळ विनायक रामचंद्र काळे यांना काठीने व हाताने मारून गंभीर जखमी केले. काळे यांच्या पत्नीने आरडा ओरडा केला. परंतु मदतीला कोणी आले नाही. त्यानंतर काळे यांच्या पत्नीने आपल्या नातवाला फोन करून बोलावून घेतल्यावर विनायक काळे यांना शिरवळ येथे गंभीर जखमी झालेल्या अवस्थेत हॉस्पिटल येथे ऍडमिट केले असता त्यांचा उजवा पाय नडगी पाशी मोडून नडगीचा पार चुरा झालेला आहे. तसेच शिरवळ पोलिसांनी संबंधितांवर ३२६ वगैरे गुन्हा दाखल केला असून वाई न्यायालयाने संबंधित आरोपींचा जामीन अर्ज फेटाळला असून संबंधित मारहाण करनारे बाळचंद नेवसे व ज्ञानदीप नेवसे यांना आज अखेर अटक नाही. संबंधितांना वरदहस्त कोणाचा आहे त्यांचा वशिला आहे अशी चर्चा गावात चालू आहे. मेंढपाळ व्यावसायिक काळे कुटुंब अजूनही न्यायाच्या प्रतीक्षेत आहे.

# शेतकऱ्यांचे गणित बिघडले!; कांदा लागवडीचा मजुरी खर्च आकाशाला भिडला



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील अनेक गावांमध्ये तसेच टाकळी ढोकेश्वर परिसरात सध्या गावरान कांद्याची लागवड सुरू आहे, पण यावेळी शेती कामासाठी लागणाऱ्या मजुरीच्या दरात मोठी वाढ झाल्याने कांदा उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. मजुरीचे दर तब्बल ७०० ते ८०० प्रति दिवस इतके वाढले आहेत, एकरी तेरा ते चौदा हजार असा मजुरीचा दर असून ज्यामुळे लागवडीचा एकूण खर्च मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. या अनपेक्षित खर्च वाढीमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे. तालुक्यातील ग्रामीण भागात शेतीकामासाठी स्थानिक मजुरांची उपलब्धता कमी झाली असून बाहेर गावावरून मजूर आणून कांदा लागवड करावी लागत आहे. यामुळे त्यांच्या वाहतूक खर्चाचा दुहेरी भुर्दंड सहन करावा लागत आहे.

कांदा लागवडीसाठी विशिष्ठ कालावधीत काम पूर्ण करणे आवश्यक असते, काही शेतकऱ्यांनी तर लाल कांदा पिकावर रोटाव्हेटर फिरवून कांद्याची लागवड केली आहे. कांद्याला यंदा चांगला दर मिळण्याची आशा आहे. त्यामुळे शेतकरी जास्त मजुरी देऊनही काम पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहेत. ७०० ते ८०० मजुरी, वाहतूक आणि इतर खर्चामुळे कांदा लागवडीचा प्रति एकर खर्च मोठ्या प्रमाणात वाढला आहे, लागवड तर महागली आहेच, पण पीक तयार झाल्यावर भाव काय मिळेल, याची भीती शेतकऱ्यांना सतावत आहे.

यावर्षी पावसाने चांगली साथ दिली असली तरी बियाणे, खते व औषधांच्या वाढलेल्या किमती आव्हान ठरत असून या सर्व अडचणीवर मात करून आणलेल्या पिकाला बाजारभाव मिळेल की नाही ही चिंता शेतकऱ्यांना सतावत आहे. तरीपण पर्याय नाही या वास्तवाला सामोरे जात शेतकरी कांद्याची लागवड करताना दिसत आहे. जर कांद्याला योग्य भाव मिळाला नाही, तर केलेला खर्चही वसूल होणार नाही. गेल्या काही वर्षांपासून कांद्याच्या निर्यातबंदीच्या सरकारी धोरणामुळे शेतकऱ्यांना बाजारपेठेत चांगले भाव मिळण्याची शाश्वती राहिलेली नाही, ज्यामुळे आधीच शेतकरी चिंतेत आहेत.

कांदा लागवडीसाठी मजूर मिळणे अवघड झाले असल्यामुळे ठराविक भागात अनुभव मजूर मिळतात. माळशेज घाटाखालील गावातील मजूरांना आणून कांदा लागवड करून घ्यावी लागत आहे. त्यांना राहण्याची, खाण्याची, नाष्ट्याची सर्व व्यवस्था शेतकऱ्यांनाच करावी लागते. त्याचबरोबर त्यांना ६०० ते ७०० रुपये प्रति दिवस याप्रमाणे हजेरी द्यावी लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर अतिरिक्त खर्च वाढत आहे.

**- संदिप नाईकवाडी (कांदा उत्पादक, टाकळी ढोकेश्वर)**

मागील वर्षी जे काम ४०० - ५०० मध्ये होत होते, त्यासाठी आज ७०० ते ८०० घ्यावे लागत आहेत. कांदा लागवड करणे आवश्यक आहे. म्हणून नाईलाजाने आम्ही हे वाढीव दर देत आहोत. सरकारने या गंभीर समस्येकडे लक्ष घ्यावे

**- गणेश रंगनाथ चौधरी (कांदा उत्पादक शेतकरी, ढवळपुरी)**

## कला क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल मनोती सोनवणे (कारंडे) यांचा सन्मान

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.३०, खंडाळा (सातारा) :** शिक्षण क्षेत्रातील कला, सर्जनशीलता आणि सातत्यपूर्ण योगदानाचा गौरव करण्यासाठी दरवर्षी विविध मानाच्या पुरस्कारांद्वारे कलाकारांचा सन्मान करण्यात येतो. त्याच परंपरेत मनोती रविंद्र सोनवणे(कारंडे) यांनी दिलेल्या योगदानाबद्दल गेल्या तीन वर्षांत त्यांना वेगवेगळ्या मानाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. सन २०२३-२४ मध्ये कला क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या कलाकारांचा सन्मान करण्यासाठी रंगोत्सव या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेच्या माध्यमातून कलाजीवी पुरस्कार प्रदान करण्यात आला. सन २०२४-२५ मध्ये कला ललित पुरस्कार देऊन कला, संस्कृती, सर्जनशील अभिव्यक्ती तसेच इंग्रजी भाषेतील योगदानाला प्रोत्साहन देण्यात आले. तसेच सन २०२५-२६ मध्ये' जॅक पोलॉक पुरस्कार' देऊन आधुनिक कला, प्रयोगशीलता आणि जागतिक स्तरावर भारतीय कलेचा ठसा उमटवणाऱ्या कार्याचा सन्मान करण्यात आला. वरील सर्व पुरस्कार मनोती रविंद्र सोनवणे (कारंडे) यांना मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. हे पुरस्कार केवळ सन्मान नसून पुढील पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा सर्जनशील प्रवास असल्याचे मत यावेळी त्यांनी व्यक्त केले. इंग्रजी भाषेतील सलग तीन वर्षांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना नॅशनल लेव्हल पुरस्कारानेही गौरविण्यात आले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची कन्या कु.मोक्षदा रविंद्र सोनवणे हिने NMMS या शासकीय स्कॉलरशिप परीक्षेत उज्ज्वल यश संपादन केले आहे. सध्या त्या संत शिक्षण संस्थेच्या पूज्य बापूजी साळुंखे विद्यालय असवली, तालुका खंडाळा जिल्हा सातारा येथे इंग्रजी विषयाच्या सहाय्यक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# जलतरण स्पर्धेत कु.समर्था साळवी दुसऱ्या क्रमांकाने विजयी

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.३०, मालगुंड (रत्नागिरी) :** रत्नागिरी जिल्हा जलतरण असोसिएशन आणि ऍकवा टेकनिकस स्विमिंग अकादमी आयोजित जलतरण स्पर्धा नुकतीच शासकीय जलतरण तलाव साळवी स्टॉप येथे पार पडली. स्पर्धेत रत्नागिरी जिल्ह्यातून सुमारे१२० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता, सदर स्पर्धेत मालगुंड, ता.जि रत्नागिरी येथील



कु.समर्था रुचिरा साईप्रसाद साळवी वय दोन वर्ष तीन महिने या चुमुकलीने ५ वर्षाखालील गटातून उतरून नेत्रदीपक अशी कामगिरी बजावत दुसरा क्रमांक पटकावला आहे.

विशेष म्हणजे स्पर्धेतील सर्वात लहान मुलगी ही समर्था होती. विवेक विलणकर तिचे (स्विमिंग कोच) यांनी जवळ जवळ एक महिना सराव घेत स्पर्धेसाठी तयार केले व तिला यश मिळून देण्यात त्यांचा मोठा वाटा ठरला आहे. कु.समर्था ही जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक महादेव सिताराम जाधव (गिमवी) ता.गुहागर यांची पणती, सुभाष पार्वतीबाई महादेव जाधव - (सेवानिवृत्त निरीक्षक एक्साईज डिपार्टमेंट) यांची नात आहे. गेले ५ महिने सातत्याने ती सराव करत होती, पाऊस असो या थंडी समर्था ने नियमित स्विमिंग मध्ये न चुकता सराव करत,अथक परिश्रम घेत सदर स्पर्धेत समर्था हिने दुसरा क्रमांक पटकवत विजयी झाल्याने तिचे सर्वत्र अभिनंदन सह कौतुक होत आहे.

## नवी मुंबई आरटीओ कार्यालयात दैनिक अक्षराज दिनदर्शिका वाटप

**अक्षराज : गणेश जाधव**



**दि.३०, नवी मुंबई :** दैनिक अक्षराज परिवारातर्फे प्रत्येक वर्षी शासकीय कार्यालये, सार्वजनिक मंडळे, सामाजिक संस्था, कला, क्रिडा, शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्तींना व सर्वसामान्य जनतेला आमच्या दैनिक अक्षराज तर्फे वार्षिक दिनदर्शिका वाटप केले जाते. त्याच पध्दतीने दिनांक २९ डिसेंबर २०२५ रोजी नवी मुंबई आरटीओ कार्यालय या ठिकाणी सहा, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन गावंडे, वाहन निरिक्षक, श्री.देवरे, श्री.भोसले, शिंदे तसेच कार्यालयीन कर्मचारी, श्री.तांडेल, श्री.रांजणे, श्री.राजपूत, श्री.कानगुडे, श्री.पवार, तेली, नांदगावकर, मगर, काणे, सुतार या सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी त्यांच्या कडून ही दैनिक अक्षराज परिवाराला नव वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. या दिनदर्शिका वाटप करत असताना, आमच्या अक्षराज परिवाराला, युवराज पाटील, भाऊसाहेब दांगट, सचिन लकडे यांचे महत्वाचे सहकार्य लाभले.